DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

**RESEARCH NEBULA**
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

One Day International E – Conference On
**Covid-19 Pandemic: Challenges, Opportunities & Solutions in Front of Higher Education**
on 21st August, 2021 @
**S.K. College Akola, AS College Kurha, S.K. Maha Dahihanda & PEFI, New Delhi.**

**डॉ. रक्षित एम. बागडे**

सहाय्यक प्राध्यापक, स्व. मन्सारामजी पडोळे कला महाविद्यालय, गणेशपूर भंडारा
rakshitbagde@gmail.com

# कोविड 19 चा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम

***ABSTRACT***

*भारतीय अर्थव्यवस्था आपल्या उर्जितावस्थेत असताना, तसेच सण 2014 पासून निरंतर कमी होता चाललेला विकास दर यात ताळमेळ घालत असताना त्यात 2020 वर्षाच्या सुरवातीलाच Covid 19 ची झड अर्थव्यवस्थेला पोहचली असल्याचे चित्र आज आपल्या समोर दिसते आहे. चीन या देशातून सुरु झालेला कोरोना हा संसर्ग जन्य आजार आज संपूर्ण जगभर आणि भारत भर पसरत चालला आहे. या आजाराने आजवर जगभर 41,94,728 च्या वर मनुष्यबडी घेतलेला आहे. आणि त्यात निरंतर वाढ होत असल्याचे आपणास दिसते आहे. विकसित तसेच विकसनशीलन देश याच्या प्रभावातून सुटलेले नाहीत. या Covid 19 चा परिणाम हा मानवाच्या अस्तित्वावर प्रश्न चिन्ह निर्माण करणारा ठरत आहे. प्रश्न निर्माण होतो आहे तो जगण्याचा आणि जिवंत राहण्यासाठीची साधने टिकविण्याचा. आजपर्यंतच्या विकासाला Covid 19 मुळे खिड लागत चालली आहे. केलेला विकास कसा टिकवायचा याची नव्याने उपाययोजना यातून निर्माण केल्या जाईल पण तोवर पोहचलेली झड भरून काढणे कठीण आणि श्रमाचे काम ठरणार आहे. भारताने स्वीकारलेल्या लॉक डाउन चा परिणाम हा पूर्ण अर्थव्यवस्थेवर पडलेला आहे. यातच जागतिक पातडीवरील अनेक संस्थांनी भारताचा विकास दर 0% राहण्याचे संकेत दिलेले आहेत.संबंधित संशोधन लेखातून कोरोना मुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर कोणते परिणाम झाले त्याचा अध्ययन करण्यात येऊन त्यातून काही उपाययोजना सुचविण्यावर भर राहणार आहे.*

***की शब्द** - Covid 19, भारतीय अर्थव्यवस्था*

**संशोधन साहित्याचा आढावा** -

सुनील कुमार (2020) - Impact of coronavirus (COVID-19) on Indian economy या आपल्या संशोधनपर लेखातून भारतीय रसायन उद्योग, ऑटो उद्योग, इलेक्टोनिक उद्योग, विदेशी व्यापार आणि कुक्कुट पालन यावरील झालेल्या परिणामाची चर्चा करतात. यात देश पातडीवर 70% उद्योग प्रभावित झालेला आल्याचे आपल्या निष्कर्षात सांगतात.

ह्यूगो इरके, रफिए हयात आणि कान जी (2020) - Coronavirus: The Economic Impact of COVID-19 on India या आपल्या संशोधनपर लेखातून सांगतात कि संसर्गामुडे भारतीय अर्थव्यवस्था होरपडत चालली असून यातून स्वास्थ सुविधांचा असलेला तुटवडा हा मोठा प्रश्न निर्माण होत आहे. जगाच्या पातडीवर भारताचा GDP कमी होत चाललेला असल्याने त्यातूनही अनेक समस्या निर्माण होणार आहेत.

भारतीय अर्थव्यवस्था हि मुख्यतः कृषी, उद्योग आणि व्यापार, सेवा या तीन क्षेत्रावर फार पूर्वी पासूनच विसंबून आहे. या तिन्ही क्षेत्रांत भारतात विकास करण्याची क्षमता असल्याने रोजगार आणि उत्पन्न निर्माण करण्याची जबाबदारी याच क्षेत्रावर येते. सध्या हे तिन्ही क्षेत्र Covid 19 च्या प्रभावाखाली आलेले आहेत.

**कृषी वर परिणाम** -

Covid 19 आणि देशव्यापी लॉकडाउनमुडे देशभरातील कृषी क्षेत्र संकटात सापडला आहे. यातच वाहतूक सुविधा बंद झाल्याने संकट आणखीनच वाढलेले आहे. देशव्यापी पुरवठा हा खोडम्बला आहे. सुरु असलेल्या रब्बी हंगामात गहू, डाळी, चना, भाज्या यांच्या वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाला. यातच हॉटेल आणि खानावडी बंद झाल्याने भाजी उत्पादन प्रभावित झाला. यालाच जोड म्हणून असलेला कुक्कुट पालन हे चुकीच्या अपप्रचारमुडे प्रभावित झाले.

या कालावधीत शेतकरी वर्गाचे उत्पन्न प्रभावित झाले असल्याने शासकीय पातडीवर PM किसान योजनेतून शेतकऱ्यांच्या खात्यात 2000 रुपये मदतीच्या स्वरूपात

टाकण्यात आलेत. शेतमजुरांना काम उपलब्ध नसल्याने त्याची नुकसान भरपाई चा कोणताच प्रयत्न शासकीय पातडीवर करण्यात आला नाही. देशपातडीवर बंद असल्याने चहा उत्पादनाची निर्यात 8% ने कमी झाली आहे. देशाच्या ग्रामीण भागात दुसऱ्या लाटेत तीव्र आणि जास्त प्रभाव हा लॉकडाऊन मुळे दिसू लागला आहे. लॉकडाऊनमुळे एपीएमसी मंडळे बंद करण्यात आल्या आहेत किंवा त्यांनी स्वेच्छेने अशी पावले उचलली आहेत. विशेषत: पीक कापणीच्या हंगामात गुजरात, राजस्थान आणि महाराष्ट्रातील एपीएमसी बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या. येणाऱ्या अनागोंदीसाठी शेतकरी तयार नव्हते. अजूनही बाजारपेठ पूर्णपणे उघडलेली नसल्याने शेतात पिके सडत आहेत. बाजारपेठा बंद पडल्यामुळे भाजी विक्रेते, प्रक्रिया उद्योगांनाही मोठा फटका बसला आहे. कृषी उत्पन्न वाढीच्या आकडेवारीमध्ये प्रथम आणि द्वितीय लाटेचा विरोधाभासी प्रभाव आपल्याला दिसतो. नोव्हेंबर 2020 ते मार्च 2020 या कालावधीत कृषी क्षेत्राची सरासरी उत्पन्नवाढ एप्रिल ते ऑगस्ट 2020 (पहिली लाट) मधील 8.5 टक्क्यांवरून घटून 2.9 टक्के (व्दितीय लाट) झाली आहे.

**उद्योग क्षेत्रावरील परिणाम -**

देशव्यापी बंद हा देशातील उद्योग धंद्यांसाठी प्रतिकूल ठरला आहे. यात दुहेरी समस्या निर्माण झाली ती म्हणजे उत्पादन बंद पडले आणि यातून मोठया प्रमाणात बेरोजगारी निर्माण झाली. जीडीपीच्या जवळपास 20% वाटा हा उद्योग क्षेत्राचा आहे. त्यापैकी 50% वाहन उद्योगाद्वारे योगदान दिले आहे. लॉकडाउनच्या अगोदरही ऑटो उद्योगाची स्थिती चांगली नव्हती, विक्री 1% टक्क्यांपेक्षा कमी आणि उत्पादन 5 ते 10% किंवा त्याहून अधिक कमी होते. असंघटित उद्योगात, परिस्थिती अधिकच वाईट होती, कारण या अनिश्चिततेचा परिणाम कमी नफा देणाऱ्या लहान संघटनांवर झाला आहे.

पूर्ण लॉकडाऊन अंतर्गत देशातील 53% व्यवसायांवर लक्षणीय परिणाम होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. 2020 मध्ये भारतीय ऑटो मॅन्युफॅक्चरिंगमध्ये 8-10 टक्क्यांची घट होण्याची शक्यता आहे. तथापि बॅटरी पुरवठा साखळीमध्ये चीनचे वर्चस्व कायम आहे कारण बॅटरी उत्पादन क्षमतेच्या जवळजवळ तीन चतुर्थांश भाग आहे.

भारत जगात औषध निर्मितीसाठी अव्वल देशांपैकी एक देश असला तरी देशांतर्गत फार्मा उद्योग मोठ्या प्रमाणात औषधांच्या आयातीवर अवलंबून असतो. सन 2019 मध्ये भारताने अंदाजे 24,900 कोटी रुपयांची मोठ्या प्रमाणात औषधे आयात केली, जी एकूण देशांतर्गत वापराच्या अंदाजे 40% आहे. चीनकडून भारताच्या API आयातीच्या किंमतीच्या सरासरी 70% आयात केल्यामुळे आयातदारांना पुरवठा खंडित आणि अनपेक्षित होऊन किंमतीच्या हालचालींचा धोका निर्माण झाला आहे. बऱ्याच गंभीर अँटीबायोटिक्स आणि अँटिपायरेटिसिस साठी चीनकडून आयात होण्यावर भारत 100 % अवलंबून आहे.

भारतातील स्थानिक डायस्टफ युनिट्स चीनमधून रसायने आणि मध्यवर्ती घटकांसह कच्च्या मालाच्या आयातीवर जास्त अवलंबून असतात. चीनकडून उशीरा झालेली वहन आणि कच्च्या मालाच्या किंमतीतील वाढ यामुळे विशेषत: गुजरातमध्ये डाईज आणि डायस्टफ उद्योगावर परिणाम होत आहे. कच्च्या मालाचा पुरवठा खंडित झाल्यामुळे सुमारे 20% उत्पादनावर परिणाम झाला आहे.

**सेवा क्षेत्रावरील परिणाम -**

सेवा क्षेत्र, आर्थिक वाढ आणि नोकरीसाठी जीवन वाहिनी आहे. मार्च मध्ये हा क्षेत्र संकुचित झाल्यामुळे नवीन व्यवसाय आणि निर्यातीची मागणी झपाट्याने कमी झाली आहे, असे एका खासगी सर्वेक्षणातून समोर आले आहे. प्रधानमंत्री यांनी भारतातील 1.3 अब्ज लोकांना घरात राहण्याचे आणि 25 मार्चपासून 21 दिवस अनिवार्य वस्तूंची विक्री करणारी दुकाने व व्यवसाय बंद करण्याचे आदेश दिले त्यामुडे एप्रिलची मंदी आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. IHS मार्केट चे अर्थशास्त्रज्ञ जो हेस यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, "2019 मध्ये आतापर्यंतची मजबूत वाढीची गती मार्चमध्ये थांबली होती कारण मागणीची परिस्थिती बिघडली होती, विशेषत: परदेशात, यामुळे व्यवसायातील क्रियाकलाप कमी झाला."


गेल्या आठवड्यात झालेल्या एका सर्वेक्षणात कंत्राटी सेवा क्षेत्रासह एकत्रित PMI इंगला मागील महिन्यात 50.6 च्या पाच महिन्यांच्या नीचांकावर आणले गेले. मार्चच्या तुलनेत सर्विसेसची मागणी 48.5 पर्यंत खाली आली असून निर्देशांक 25 महिन्यांच्या नीचांकी आहे. लॉकडाऊनमुळे छोटे उद्योगांकडून मोठ्या प्रमाणात नोकरी कमी केल्या जात असल्याने सरकारवर आधीपासूनच दबाव आहे.

एप्रिल - जून 2020 कालावधीत Covid 19 चा प्रभाव (अंदाजित)

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071




स्रोत - statista 2020

भारतात 2019-20 Corona या साथीच्या प्रसारामुळे अर्थव्यवस्था मुख्यत्वे विस्कळीत झाली आहे. भारताच्या आर्थिक उदारीकरणानंतरच्या तीन दशकांतील सर्वात कमी आकडेवारीनुसार जागतिक बँक आणि पत रेटिंग एजन्सीने सन 2021 च्या आर्थिक वर्षातील भारताची वाढ कमी केली आहे . भारत सरकारचे माजी मुख्य आर्थिक सल्लागार यांनी असे म्हटले आहे की, वित्तीय वर्ष 21 मध्ये भारताने नकारात्मक वाढीसाठी तयारी करावी. एका महिन्याच्या आत बेरोजगारी 1 मार्च रोजी 7.7% वरून 1 एप्रिल रोजी 26% पर्यंत वाढली. लॉकडाऊन दरम्यान, अंदाजे 1 कोटी लोकांनी रोजगार गमावला आहे. देशभरातील 45% पेक्षा जास्त कुटुंबांनी मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी उत्पन्नामध्ये घट नोंदविली आहे.

जागतिक स्तरावर Edelman Trust Barometer च्या सर्वेक्षणानुसार 13,200+ लोकांपैकी 67% लोक असे मत व्यक्त करतात की "अर्थव्यवस्था अधिक हळूहळू सुधारेल याचा अर्थ असला तरी सरकारची सर्वोच्च प्राथमिकता जास्तीत जास्त लोकांचे जीवन वाचवणे असले पाहिजे", म्हणजेच जीवन जगण्यापूर्वी, जगायला हवे. भारतासाठी, सर्वेक्षणात 64% ते 36% असे प्रमाण दर्शविले गेले होते, जिथे जास्तीत जास्त लोकांचे प्राण वाचवणे हे प्राधान्य असल्याचे 64% लोक सहमत होते आणि 36% लोक सहमत होते की नोकरी वाचवणे आणि अर्थव्यवस्था पुन्हा सुरु करणे ही महत्वाचे आहे. भारतात आजीविका विरुद्ध उदरनिर्वाहाची चर्चादेखील रंगली, सरकारने प्रथम जाहीर केले की प्राथमिकते पेक्षा जीवनाला प्राधान्य दिले जाईल, ज्यात नंतर जीवन आणि आजीविका यांना समान महत्त्व देण्यात आले. मे च्या मध्यापर्यंत केंद्र सरकार आर्थिक क्रियाकलाप पुन्हा सुरू करण्यास उत्सुक होते, तर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची संमिश्र प्रतिक्रिया होती.

प्रधानमंत्री यांनी 24 मार्च रोजी भारताच्या पहिल्या 21 दिवसांच्या लॉकडाऊनची घोषणा केली. देशाला या संबोधना दरम्यान ते म्हणाले, " जान है तो जहान है " 11 एप्रिल रोजी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीत "जान भी जहान भी" 12 मे रोजी प्रधानमंत्री यांनी देशाला संबोधित करताना सांगितले की कोरोनाव्हायरस संकटाला संधी म्हणून पाहिले जावे आणि देशांतर्गत उत्पादनांवर भर द्यावा. "आर्थिक स्वावलंबन" आणि "आत्मनिर्भर भारत" अभियानाच्या घोषणा दिल्या. दुसऱ्या दिवशी अर्थमंत्र्यांनी प्रधानमंत्र्याच्या दृष्टीकोनाचा तपशील घालणे सुरू केले जे पुढील काही दिवस चालू राहिले. त्यावर अर्थमंत्र्यांनी नमूद केले की "स्वावलंबी भारत याचा अर्थ उर्वरित जगापासून दुर राहने असा होत नाही"

भारतात 53% व्यवसायांनी कोविड 19 च्या कारणास्तव बंद पडलेल्या शटडाऊनचा काही प्रमाणात परिणाम निर्दिष्ट केला आहे . हॉटेल आणि एअरलाइन्ससारखे विविध व्यवसाय पगार कापून कर्मचाऱ्यांना सोडत आहेत. "सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी" च्या म्हणण्यानुसार 14 कोटी भारतीय लॉकडाऊनमध्ये रोजगार गमावून बसलेत. 4 एप्रिल रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे माजी अध्यक्ष रघुराम राजन म्हणाले की, 'भारतातील कोरोनाव्हायरस सर्व देशभर स्वातंत्र्यानंतरची सर्वात मोठी आपत्कालीन परिस्थिती असू शकते.' भारत सरकारचे माजी मुख्य आर्थिक सल्लागार यांनी असे म्हटले आहे की, वित्तीय वर्ष 2021 मध्ये भारताने नकारात्मक वाढीसाठी तयार राहावे आणि आर्थिक नुकसान दूर करण्यासाठी भारताला 720 लाख कोटी रुपये प्रोत्साहन आवश्यक असेल. यातच 12 मे ला प्रधानमंत्री यांनी एकूण 20 लाख कोटी रुपये आर्थिक पॅकेज ची घोषणा केली. केलेली तरतूद फार अल्प असल्याने त्याचा जास्त काही परिणाम झालेल्या नुकसानीला भरून काढण्यास पुरेसा ठरेल असे वाटत नाही.

देशाच्या मागील 2.9 ट्रिलियन डॉलरच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या आधारे विचार केला तर, (संपूर्ण लॉकडाऊन, त्यात जीवनावश्यक वस्तूंच्या समावेशासह) दिवसाला अंदाजे सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या 8 अब्ज डॉलरचे नुकसान होण्याची शक्यता आहे. Corona महासंकट आणि टाळेबंदी गृहीत धरले तर, सकल राष्ट्रीय उत्पादनाचे अंदाजे 240 अब्ज डॉलरचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

या संकटाने अर्थव्यवस्थेचा आधारच अस्ताव्यस्त करून टाकले आहे. म्हणून त्याची बांधणी किंवा पुनर्बांधणी करण्यासाठी दीर्घ कालावधी लागण्याची शक्यता आहे. हे चित्र चीनमध्ये पाहायला मिळत आहे. तेथे कामगारांची संख्या रोडावली आहे. हा आजार पुन्हा बळावू नये तसेच त्याची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता देशपातळीवर सर्वतोपरी खबरदारी घेतली जात आहे. परत येणाऱ्या कामगारांची कसून वैद्यकीय तपासणी प्रत्येक ठिकाणी केली जात आहे. ज्या प्रमाणे अमेरिकेत अर्थतज्ज्ञ किंवा

गुंतवणुकदारांना अपेक्षित आहे, त्याप्रमाणे भारताकडून जलदगतीने हानी भरून निघण्याची अपेक्षा न ठेवता, हि हानी भरून निघण्यासाठी थोडी वाट पाहणे अपेक्षित आहे.

येणाऱ्या काळात भारताला आपल्या अर्थव्यवस्थेची योग्य घडी बसविण्याकरिता मूलभूत अश्या सुधारणा करणे गरजेचे राहणार आहे. यात कृषी व त्यावर आधारित उद्योग, रोजगार निर्मिती, उत्पन्न, ग्रामीण विकास, कृषी कर्ज, औदयोगिक विकास, आधारसंरचना विकास याकडे जास्त लक्ष्य देण्याची गरज आहे. विस्थपित झालेल्या लोकांना रोजगार देणे हि आता सरकारने आपली प्राथमिकता म्हणून विचारात घेणे आवश्यक झाले आहे. वैद्यकीय आणि आरोग्यविषयक कार्यक्रमावरील खर्च वाढविणे, यात फक्त नाविन्यपूर्ण उपचार (लसीचा शोध) नव्हे, तर एक व्यापक अभियान देखील असेल. यामध्ये कोरोना चाचणी केंद्रांची क्षमता तसेच गुणवत्तेत वाढ करून कोरोना बाधित व्यक्तींना शोधून त्यांच्यावर तातडीने उपचार करावेत. यामुळे खरोखरच आत्मविश्वास वाढू शकेल. एकूणच आता आर्थिक सामाजिक सुधारणेच्या एका नव्या अध्यायाला सुरुवात होणे गरजेचे असून, ज्यात संबंधित संपूर्ण समाजाचे हित जपणे आवश्यक आहे.

संदर्भ -

1. FICCI (2020) Impact-of-COVID-19-on-Indian-Economy March 20
2. Hugo Erken, Raphie Hayat and Kan Ji (2020) Coronavirus: The Economic Impact of COVID-19 on India published on Bloomberg/Quint, March 13 jagranjosh.com
3. Maryla Maliszewska Aaditya Mattoo Dominique van der Mensbrugghe (2020) The Potential Impact of COVID economist & Macroeconomics, Trade and Investment Global Practice April
4. Sunil Kumar (2020) GDP and Trade East Asia and the Pacific Region Office of the Chief Impact of coronavirus (COVID-19) on Indian economy AGRICULTURE & FOOD: e-Newsletter Volume 2 – Issue 4 – April 2020 ISSN: 2581-8317
5. https://www.orfonline.org/marathi/covid-19-and-the-likely-economic-impact-64743/
6. wikipedia.org
7. researchgate.net